PC_2\D:\EL\Election-2017\Election 2017\Teacher Ele-17

# मुंबई विद्यापीठ

निवडणूक विभाग
अत्यंत महत्वाचे

e-mail- arelection@election.mu.ac.in
Tel. No. - 022-2270 8798
022-2269 6147

क्र.नि.वि. EL/ (Senate)(T) 28(2)(r)/(AC) 32(3)(g)/ **711** of 2018.

परिपत्रक-

विषय:- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम २८(२)(द)(r) नुसार महाविद्यालयीन अध्यापकांमधून अधिसभेच्या १० आणि कलम ३२(३)(छ)(g) नुसार विद्यापरिषदेवर प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे प्रत्येकी २ अध्यापकांच्या जागांच्या निवडणूकांसाठी अंतीम मतदारयादी प्रसिध्द करणे.

संदर्भ:- १. परिपत्रक क्रमांक. EL/ (Senate)28(2)(r)/**97** of 2017, दिनांक ३ जून, २०१७
२. जाहीर प्रकटन दिनांक १७ जून, २०१७
३. परिपत्रक क्रमांक EL/(Senate)(T) 28(2)(r)/(AC)32(3)(g)/**570** of 2018, दिनांक २३ जानेवारी, २०१८
४. परिपत्रक क्रमांक EL/(Senate)(T) 28(2)(r)/(AC)32(3)(g)/**597** of 2018, दिनांक ३० जानेवारी, २०१८

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन महाविद्यालयीन अध्यापकांची मतदार यादी तयार करण्यासाठी माहिती मागवून त्याअन्वये दुरुस्त मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली होती त्याला अनुसरुन दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत अपील मागविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने आलेल्या अपीलांचा विचार करुन अंतिम मतदार यादी मंगळवार, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे.

एकरूप परिनियम क्रमांक १ मधील ७(१) नुसार मतदार यादी विद्यापीठाच्या www.mu.ac.in च्या election portal किंवा www.musenate.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असेल आणि सदर यादी विना मुल्य डाउनलोड करता येऊ शकेल. तसेच विक्रीकरीता वित्त व लेखा विभाग, कक्ष क्र. १३, तळ मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, येथे मतदार यादी (पुस्तक करीता) शुल्क रु. ५५०/- प्रती आणि सीडी करिता रु. २५०/- प्रती भरणा केल्याची पावती दाखविल्यानंतर निवडणूक विभाग, कक्ष क्र. ११० मुंबई विद्यापीठ, फोर्ट, येथे उपलब्ध असेल.

अधिसभेवर अध्यापकांच्या १० जागांसाठी आणि विद्यापरिषदेवर प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे प्रत्येकी २ अध्यापकांच्या जागांच्या निवडणूकीचा कार्यक्रम स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत
(डॉ दिनेश कांबळे)
कुलसचिव
तथा निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक - ०९ फेब्रुवारी, २०१८
स्थळ - मुंबई

Note:- Section 2(18) of the Maharashtra Public Universities Act, 2016 is as under:-
"Collegium of Teachers" means an electoral college consisting of fulltime approved Teachers from affiliated and autonomous of colleges and recognized institutions,who shall elect from amongst themselves as members to the different authorities.

प्रत माहितीसाठी रवाना :-

१. प्राचार्य, संलग्न/महाविद्यालये व संचालक, मान्यताप्राप्त संस्था यांना विनंती करण्यात येते की सदर परिपत्रक सर्व विभाग प्रमुखांच्या निदर्शनास आणण्यात यावे व सुचना फलकावर लावण्यात यावे.

२. उपकुलसचिव, सामान्य प्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, तळ मजला, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी परिसर, कालिना, सांताक्रुज (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.

३. सहायक कुलसचिव, रत्नागिरी उपकेन्द्र, मुंबई विद्यापीठ, पी-६१, एम.आय.डी.सी., मिरजोळे, जिल्हा - रत्नागिरी-४१५ ६३९.

४. संचालक, सिस्टम नेटवर्क मॅनेजर, विद्यापीठ संगणक केंद्र, कालिना, सांताक्रूज (पूर्व), मुंबई - ४०० ०९८, मुंबई विद्यापीठाच्या संकेत स्थळावर सदर परिपत्रक दाखविण्यासाठी.

५. प्राचार्य, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय.

६. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख,

७. उपकुलसचिव (वित्त व लेखा), परीक्षा भवन, विद्यानगरी,

८. उपकुलसचिव (वित्त व लेखा), फोर्ट,

९. सर्व वर्तमानपत्रांचे संपादक यांना विनामुल्य बातमी प्रसिध्द करण्यासाठी.

१०. सर्व स्वीय सहायक १. कुलगुरु, २. प्र.कुलगुरु, ३. कुलसचिव.

स्वाक्षरीत
(डॉ दिनेश कांबळे)
कुलसचिव
तथा निवडणूक निर्णय अधिकारी

तथा निवडणूक निर्णय अधिकारी

Note:- Section 2(18) of the Maharashtra Public Universities Act, 2016 is as under:-
"Collegium of Teachers" means an electoral college consisting of fulltime approved Teachers from affiliated and autonomous of colleges and recognized institutions,who shall elect from amongst themselves as members to the different authorities.